**अतितात्काळ**

क्रमांक पोमसं/८-अ/३५५४/नि.सू.-२०१५-१६(वश्रेलि-प्रलि)/जिल्हा/११०/२०१६. मुंबई, दि. ४/२/२०१७

संदर्भ :- या कार्यालयाचे ज्ञापन दि. १८/५/२०१६, दि. २२/११/२०१६.

**विषय :- पोलीस महासंचालकांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील वरिष्ठ श्रेणी लिपीकांना प्रमुख लिपीक पदावर पदोन्नती देण्यासाठी सन-२०१६-१७ व ची निवडसूची तयार करण्याबाबत.**

*****

पोलीस महासंचालकांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील प्रमुख लिपीकांची पदे पदोन्नतीने भरण्याकरिता सन २०१६-१७ ची निवडसूची तयार करण्याकरिता खालील नमूद वरिष्ठ श्रेणी लिपीकांची सेवाविषयक परिपूर्ण व बिनचूक माहिती **सोबतच्या प्रपत्रात,** खालील दिलेल्या सुचनांनुसार, संबंधित परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी घटकांकडुन माहिती एकत्रित संकलित करुन उलट टपाली स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह **दि.१०/२/२०१७ पूर्वी** ह्या कार्यालयातील **कार्यासन क्र.८अ मध्ये माहिती सादर करावी.** अशी विनंती आहे.

२. खालील नमूद वरिष्ठ श्रेणी लिपीकांची त्या पदातील ज्येष्ठता त्या-त्या परिक्षेत्रात नमूद केलेल्या दिनांकानुसार व जातीचा प्रवर्ग त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदीनुसार पडताळणी करुन सादर करावा. तसेच त्यांचे **जात वैधता प्रमाणपत्राची छायांकित प्रत साक्षांकित करुन जोडावी.**

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब,दि.१८.५.२०१३ अन्वये दिलेल्या निर्देशांनुसार लिपीकांची जातीदाव्याची पडताळणी करुन माहिती सादर करण्यात यावी. तसेच, खालील नमूद लिपिकांपैकी ज्या लिपिकांचे अनुसूचित जमातीचे जातप्रमाणपत्र अवैध ठरले आहेत, व त्यांनी आता विशेष मागास प्रवर्गाचे जातवैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. अशा लिपिकांची शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.२४.६.२००४, व ३१.६.२००४ मधील तरतुदींनुसार सेवाज्येष्ठता पुनर्निश्चितीची कार्यवाही करुन त्याप्रमाणे ह्या कार्यालयास स्पष्टपणे कळवावे.

४. जे कर्मचारी अपंग असतील तर ते किती टक्के अपंग आहेत, व त्यांचे **अपंगत्वाचे प्रमाणपत्र साक्षांकित** प्रतीसह सादर करावे.

५. खालील नमूद वरिष्ठ श्रेणी लिपीकांपैकी जे स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले असतील, त्यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीस परवानगी दिल्याबाबतचा आदेशाचा क्रमांक व दिनांक, तसेच त्यांना कोणत्या दिनांकापासून स्वेच्छासेवानिवृत्ती मंजुर करण्यात आली आहे ते स्पष्ट नमूद करावे.

६. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.परीक्षा-२०१२/प्र.क्र.३/१७, दि.१३/९/२०१२ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार ज्या कर्मचाऱ्यांना पर्यवेक्षीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देय आहे. त्या कर्मचाऱ्यांच्याबाबत त्यांना देण्यात आलेली सूट योग्य आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करुन, त्यांना पर्यवेक्षीय परीक्षा उतीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेल्या आदेशाचा क्रमांक व दिनांक स्पष्टरित्या नमूद करावा.

७. शासन निर्णय क्र.दि. १/१२/१९८४ व ३१/१२/१९८७ नुसार अनुक्रमे हिंदी / मराठी भाषा परीक्षेत सूट देण्यात आल्याबाबतचा आदेशाचा क्रमांक व दिनांक स्पष्ट नमूद करावा. तसेच संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक, व संगणक परीक्षा उत्तीर्ण नसल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.२/९/२००३ मधील तरतुदींनुसार सुट दिलीअसल्यास त्याबाबचा आदेशाचा क्रमांक व दिनांक नमूद करावा. ज्या लिपिकांनी संगणक परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही. परंतु त्यांनी वयाची ५० वर्षे पूर्ण केलेली आहेत, तरीही त्यांनी संगणक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्याबाबत निवेदन सादर केलेले नाही. अशा लिपिकांकडुन विनंती अर्ज प्राप्त करुन त्यांना संगणक परीक्षेत सूट देऊन आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे. अशा लिपिकांच्याबाबतची कार्यवाही करुन ह्या कार्यालयास कळवावे.

९. वरिष्ठ श्रेणी लिपीकांनी भरती दिनांका पासून ते अद्यापपर्यत ज्या ज्या कार्यालयात कर्तव्य बजावलेले आहे. त्याबाबतचा तपशिल (कधी पासून केव्हा पर्यंत) संपूर्ण दिनांकासहित नमूद करावा.

| अ क्रमांक | परिक्षेत्रीय जेष्ठता | नाव | प्रवर्ग | पदोन्नती दिनांक | नेमणूक |
|---|---|---|---|---|---|
| १. | नाशिक परिक्षेत्र/४४ | श्रीमती नंदा नानाजी अहिरे | अ.जा. | १०.६.२०११ | पोअ नाशिक ग्रामीण |
| २. | कोल्हापूर परि./१२७ | श्री. सोमनाथ रघुनाथ अडसुळ | अ.जा. | १.७.२०११ | पुणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | औरंगाबाद परि. / १८ | श्री. रमेश विठ्ठलराव कुचेकर | अ.जा. | ६.७.२०११ | जालना |
| ४. | कोल्हापूर परि./१३१ | श्री. यशवंत हरिभाऊ साळवे | अ.जा. | ८.७.२०११ | मो.प. विभाग, पुणे |
| ५. | कोल्हापूर परि./१३२ | श्री. सुनिल विलास सातपुते | अ.जा. | ८.७.२०११ | प्राचार्य, पोप्रके तासगाव सांगली |
| ६. | कोल्हापूर परि./१३४ | श्री. सुभाष दत्तात्रय पाटोळे | अ.जा. | २६.७.२०११ | प्राचार्य, पोप्रके तासगाव सांगली |
| ७. | औरंगाबाद परि. / २४ | श्री. सुनिल साहेबराव बाबर | अ.जा. | ८.८.२०११ | पोअ बीड |
| ८. | औरंगाबाद परि. / २७ | श्री. सुरेश लक्ष्मण पदमे | अ.जा. | ८.८.२०११ | रारापोबल गट ३ जालना |
| ९. | अमरावती परि. / ३६ | श्री. डी. डब्ल्यू.घोडेस्वार | अ.जा. | १२.९.२०११ | यवतमाळ |
| १०. | अमरावती परि. / ४१ | श्रीमती एस.एस.यावले | अ.जा. | २३.९.२०११ | अमरावती शहर |
| ११. | अमरावती परि. / ४३ | श्रीमती व्ही.एन्.गवई | अ.जा. | १४.९.२०११ | बुलढाणा |
| १२. | अमरावती परि. / ४९ | श्री. टि. जी. धारगावे | अ.जा. | १२.९.२०११ | बुलढाणा |
| १३. | अमरावती परि. / ५२ | श्रीमती एस्.ए.तायडे | अ.जा. | १४.९.२०११ | अमरावती |
| १४. | अमरावती परि. / ५४ | श्री. एस.जी. टेवरे | अ.जा. | १७.९.२०११ | अमरावती शहर |
| १५. | अमरावती परि. /६० | श्री. एस्. व्ही. राऊत | अ.जा. | १६.९.२०११ | अमरावती शहर |
| १६. | अमरावती परि. / ६१ | श्री. एस. टी. बोर्डे | अ.जा. | ११.९.२०११ | बुलडाणा |
| १७. | अमरावती परि. / ६४ | श्री. मुकुंद बारकू खरात | अ.जा. | १२.९.२०११ | बुलढाणा |

४/२/११

**(दिलीप दळवी)**
पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहायक (र. व का.)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र / औरंगाबाद परिक्षेत्र / कोल्हापूर परिक्षेत्र / नाशिक परिक्षेत्र

प्रत,

पोलीस आयुक्त, अमरावती शहर / पुणे शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक, मो.प.वि., पुणे
पोलीस अधीक्षक, बुलढाणा / नाशिक ग्रामीण / यवतमाळ / बीड / जालना
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ३ जालना
प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण केंद्रे तासगाव सांगली

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोमंस कार्यालय, मुंबई
२. सदरचे ज्ञापन ७ दिवसाकरिता सर्वांसाठी उपलब्ध करुन द्यावे.

कार्यासन अधिकारी, का.क्र. १०.
२. वर नमूद वरिष्ठ श्रेणी लिपीकांच्या अद्ययावत गोपनीय अहवाल नस्त्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या वेळी कृपया उपलब्ध करुन द्याव्यात.

कार्यासन अधिकारी, का.क्र. १२.
२. वर नमूद वरिष्ठ श्रेणी लिपीकांविरुध्द विभागीय चौकशी किंवा शिक्षा प्रलंबित / प्रस्तावित असल्यास त्याबाबतची सविस्तर माहिती कृपया ह्या कार्यासनास द्यावी.

# वरिष्ठ श्रेणी लिपीकांची महिती सादर करावयाचे विवरणपत्र.

| अ. क्र. | पूर्ण नांव / जातीचा प्रवर्ग / जन्मतारीख / सेवानिवृत्तीचा दिनांक / सध्याची नेमणूक | पदोन्नती दिनांक | संपूर्ण सेवा तपशील | विभागीय चौकशी किंवा न्यायिक प्रकरण सुरु / प्रस्तावित अथवा प्रलंबित आहे काय ? एखादी शिक्षा भोगत आहे / प्रस्तावित आहे काय असल्यास सविस्तर माहिती सादर करावी | जातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात आली आहे ? | अपंग आहे काय ? असल्यास अपंगत्वाचा प्रकार नमूद करावा. | अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत काय / उत्तीर्ण होण्यासापासून सूट दिलेली आहे काय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | |
| | पूर्ण नांव नमूद करावे. खुला / इ.मा.व. / अ.जाती / अ.जमाती/ वि.जा-अ / भ.ज.-ब / भ.ज.-क / भ.ज.-ड / वि.मा.प्र. ह्यापैकी जो प्रवर्ग असेल तो नमूद करावा.<br>जन्म तारीख व सेवानिवृत्तीचा अचूक दिनांक नमूद करावा. | वरिष्ठ श्रेणी लिपीक पदोन्नती स्वीकारल्याचा दिनांक / मानिव दिनांक दिला असल्यास मानिव दिनांक नमूद करावा | संबंधीताने प्रत्येक पदावर कोणकोणत्या कार्यालयात कधी तारखे पासून कधी तारखे पर्यंत काम केले आहे यांची माहिती नमूद करावी. | आवश्यक त्या आदेशांच्या निलंबन आदेश / निलंबनातून मुक्त केल्याचे आदेश / निलंबन कालावधी नियमित केल्याचे आदेश / शिक्षा दिल्याबाबतचे आदेश / निर्दोष मुक्ततेबाबत न्यायालयाचे आदेश इ. प्रती सादर कराव्यात. | जाती दावा वैध असल्याच्या प्रमाणपत्राची **प्रमाणित** प्रत सादर करावी. | अपंग असल्यास, अपंगत्वाचा प्रकार अस्थीव्यंग / दृष्टीदोष / कर्णबधीर इ. नमूद करावा. व अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करावे. | • पर्यवैक्षीय परिक्ष ा उत्तीण केल्याचे वर्ष / सुट दिली असल्यास आदेश क्र.<br>• एतद्‌र्थ मंडळाची हिंदी व मराठी परीक्षा उत्तीर्ण झाले असल्यास किंवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली असल्यास आदेश क्र. /<br>• संगणक चलन हाताळणी प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास तसे कळवावे किंवा वर नमूद परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली असल्यास सूट दिलेल्या आदेशांच्या प्रती सोबत जोडाव्यात. |

प्रमाणित करण्यात येते की, वर नमूद माहिती अभिलेखानुसार बरोबर आहे.

घटकप्रमुखाचे नांव / पदनाम व स्वाक्षरी